# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ४४९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२७/०७/२०१६.

**१) संगनमत करुन मारहान व जखमी केले. :–**

दिनांक २६/०७/२०१६ रोजी १८.१५ वा. दरम्यान यातील कैलास श्रीराम कोसरे वय ३० वर्ष, रा. तुकडा यांनी आरोपी क्र. २ यास ''आपले लाकुड बाजुला कर म्हटले'' या कारणा वरुन तिन्ही आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ याने कु–हाडीचे मुंदईने फिर्यादीचे वडील श्रीराम बालाराम कोसरे यांचे डोक्यावर मारुन जखमी केले व आरोपी क्र. २ ने लोखंडी पाईपने फिर्यादीचे पोटावर, डावे हातावर व आरोपी क्र.३ ने लाथा बुक्यांनी मारपीट करुन जखमी केले. असे फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाधवे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०७/२०१६ रोजी १४.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन दिघोरी टी पॉईट येथे आमरोडवर उभी करुन जाणा–या येणा–या वाहतुकीस अडथळा करीत असतांनी मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादि पोना. अरकासे पो.स्टे. दिघोरी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. अरकासे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २७/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०३ केसस, तिन सिटर वाहनांवरती ९ केसेस व इतर वाहनांवरती ११९ केसेस करण्यात आलेल्या आहे

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.